# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ०६/२०२१

**विषय:** मार्च/एप्रिल,२०२१( **नियोजन जुलै/ऑगस्ट, २०२१)परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

कोविड–१९ च्या प्रार्दूभावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष (पदविका,पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या एप्रिल/मे, २०२१ (उन्हाळी २०२१) परीक्षांकरिता मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे.

१. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील (पदविका, पदवी व पदव्युत्तर) अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२०—२१ च्या द्वितीय सत्राच्या नियमित व अनुशेषित विद्यार्थ्यांच्या तसेच बहि:स्थ, श्रेणीसुधार, B.A. To B.A., B.Sc. To B.Sc. मार्च /एप्रिल, २०२१ मधील परीक्षा जुलै व ऑगस्ट, २०२१ या कालावधीत टप्याटप्याने घेण्यात येतील.

२. या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक, सेमिनार, मिनीप्रोजेक्ट, प्रोजेक्टस व डेझरटेशन इ. परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर पूर्ण करण्यात यावे. अंतर्गत गुण संगणक संरक्षित प्रणाली मार्फत विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत. द्वितीय सत्राची समरी उपलब्ध झाल्यावर त्वरीत गुण भरणे अनिवार्य राहील. द्वितीय सत्राच्या परीक्षेच्यावेळी डेझरटेशनकरीता परीक्षा आवेदनपत्र भरण्यात आलेल्या एम.ई., एम.फार्म व एम. आर्किटेचर या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या डेझरटेशन परीक्षांचे महाविद्यालय स्तरावर मा.प्राचार्य यांनी परीक्षकांची समिती गठित करुन विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन करुन त्यांना या परीक्षेत मिळालेले गुण दि. ३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत अंतर्गत गुण संगणक संरक्षित प्रणाली मार्फत विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे.

३. इन–सेमिस्टर, ऑनलाईन (इंजिनिअरिंग व मॅनेजमेंट अभ्यासक्रमासाठी घेतल्या जाणा–या परीक्षा) सेशनल व्हायवा यांचे महाविद्यालय/संस्था स्तरावर उपलब्ध सुविधांचा वापर करुन आयोजन करण्यात यावे. कुठल्याही प्रात्यक्षिक, मौखिक, सेमिनार, मिनी प्रोजेक्टस व डेझरटेशन परीक्षांकरिता परीक्षा विभागाकडून बहि:स्थ पर्यवेक्षकांच्या नेमणूका केल्या जाणार नाहीत तसेच महाविद्यालयांकरिता वेगळे वेळापत्रक पाठविले जाणार नाही. या अंतर्गत परीक्षांचे गुण संगणक प्रणालीमार्फत विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे. फक्त एम.सी.ए. व एम.बी.ए. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिकांसाठी बहि:स्थ परीक्षक विद्यापीठाकडून नेमण्यात येतील.

४. **ऑनलाईन परीक्षांचे आयोजन** :

अ) जुलै व ऑगस्ट, २०२१ या कालावधीत विद्यापीठ स्तरावर घ्यावयाच्या ऑनलाईन परीक्षांचे आयोजन पूर्ण झाल्यावर वेळापत्रक www.unipune.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ब) उपरोक्त ऑनलाईन परीक्षांचे आयोजन, हे केंद्र व राज्य शासनाने कोविड–१९ च्या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आरोग्याची संपूर्ण काळजी घेऊन विद्यार्थ्यांनी सोयीच्या असलेल्या ठिकाणाहून उपलब्ध सुविधांचा जसे संगणक/लॅपटॉप/मोबाईल इ. वापर करुन देणेबाबत अनुमती देण्यात आली आहे.

या ऑनलाईन परीक्षेसाठी बहुपर्यायी प्रश्न (MCQ) असतील. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न दिले जातील. त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील व या परीक्षेचा कालावधी एक तास (६०मिनिटे) असेल.

विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील गणित व संख्याशास्त्र, प्रथम वर्ष बी.सी.ए. अंतर्गत गणित तसेच अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील गणित या विषयांच्या ५० गुणांच्या ऑनलाईन परीक्षेसाठी ३० बहुपर्यायी प्रश्न दिले जातील. विद्यार्थ्यांनी दिलेल्या २५ अचूक प्रश्नांची उत्तरे ग्राहय धरण्यात येतील. यासाठी प्रत्येक प्रश्न २ गुणांचा राहील आणि परीक्षा कालावधी १ तास (६० मिनिटे) राहील.

क) प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी बहुपर्यायी प्रश्न सर्व विद्याशाखेतील सर्व विषयांसाठी १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारीत राहतील. तथापि, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत येणाऱ्या विज्ञान शाखेच्या अंतिम वर्षाच्या /अंतिम सत्राच्या (TYBSC) परीक्षांकरिता ७० टक्के अभ्यासक्रम निर्धारीत केलेला आहे. हा अभ्यासक्रम unipune.ac.in या वेबपोर्टलवर General Circulars (Examinations) यावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

ड) ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत आवश्यक ती सर्व माहिती विद्यार्थ्यांना एसएमएस (SMS) व ई—मेल द्वारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई—मेल आय डी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

इ) ऑनलाईन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही सेव्ह होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा सुरू होईल. ऑनलाईन परीक्षांचे गुण विद्यार्थ्यास परीक्षा दिल्यानंतर ४८ तासांच्या आत स्टुडंटस् प्रोफाईल सिस्टीममार्फत उपलब्ध करून दिले जातील.

ई) सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी व परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी sps.unipune.ac.in यामध्ये लॉगीन करून तक्रारी नोंदवाव्यात.

उ) विद्यार्थ्यांस ऑनलाईन परीक्षा देताना नैसर्गिक आपत्ती, तांत्रिक अडचण अथवा कोरोना प्रार्दुभाव किंवा तत्सम आजार झाल्यास त्यास आवश्यक त्या बाबींची खातरजमा केल्यानंतर विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येईल.

ऑनलाईन परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी सर्वसाधारण प्रश्नांवर आधारित सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test/Practice Test) मुख्य परीक्षा सुरू होण्याच्या तीन दिवस अगोदर केले जाईल.

५) दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाईन परीक्षेसाठी विशेष बाब म्हणून उपलब्ध करून दिलेल्या सुविधेप्रमाणे सोयी व सवलती दिल्या जातील. दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा कालावधी देय राहील. अंध विद्यार्थ्यांकरिता Accessbility Tools वापरुन मूळ संगणकीय प्रणालीमधून परीक्षा देता येईल.

६) ऑनलाईन पध्दतीने बहुपर्यायी प्रश्न (MCQ) परीक्षेसाठी छायांकित प्रत व पुर्नमूल्यांकनाची सुविधा उपलब्ध असणार नाही.

७) परीक्षा विभागाच्या परिपत्रक क्रमांक १२५, दि. १ जून, २०११ अन्वये पदविका, पदवी अभ्यासक्रमांच्या उन्हाळी २०२१ च्या परीक्षांचे नियोजन महाविद्यालय स्तरावर जून/जुलै/ऑगस्ट, २०२१ मध्ये विद्यापीठाच्या परीक्षांच्या नियोजनाच्या धर्तीवर करण्यात यावे.

८) खाली नमूद केलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा तसेच एम.ई. (Elective) या परीक्षा महाविद्यालय/संस्था स्तरावर पूर्वीप्रमाणे आयोजित करण्यात याव्यात.

| Faculty_Name | Pattern_Id | Pattern_Name |
|---|---|---|
| ARTS | 11813 | BACHELOR OF ARTS (REV.2013) |
| Commerce | 10216 | B.B.A.( Computer Application) 2016 |
| Commerce | 10313 | B.B.M.(INTERNATIONal BUSINESS)(Rev.2013) |
| Commerce | 10316 | B.B.A.( International Business ) 2016 |
| Commerce | 10113 | Bachelor Of Business Administration(Rev.2013) |
| Commerce | 12013 | BACHELOR OF COMMERCE(REV.2013) |
| LAW | 13117 | B.A.LL.B. 2003 Pattern & Rev.2017 |
| LAW | 12117 | LLB 2003 Pattern & Rev.2017 |
| Science | 11913 | BSC(BIOTECH)(Rev.2013) |
| Science | 12516 | BSc(Animation)(REV.2016) |
| Science | 13416 | BCA(Science) 2016 |
| Science | 11013 | B.Sc. Computer Science(Rev.2013) |
| Science | 10617 | BScHS(REV. 2017) |
| Science | 11713 | B.Sc.(REGULAR)(Rev.2013) |
| Engineering | | M.E. (All Elective) |

उपरोक्त परीक्षांचे आयोजन केंद्र व राज्यशासन, युजीसीने कोविड–१९ च्या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आरोग्याची संपूर्ण काळजी घेऊन ऑनलाईन बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या एक तास (६० मिनिटे) कालावधीच्या जून/जुलै/ऑगस्ट, २०२१ मध्ये महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर आवश्यक त्या उपलब्ध सुविधांचा वापर करुन करण्यात याव्यात. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील. या परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/परिसंस्था यांच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व याबाबतचा सविस्तर तपशील परीक्षा–समन्वय कक्षास सादर करण्यात यावा. तसेच अनुशेषित व नियमित परीक्षार्थीचे पेपर एकाच दिवशी येणार नाहीत याची संपूर्ण काळजी महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर घेण्यात यावी.

९) स्वायत्त महाविद्यालय/संस्थांनी सर्व नियमांचे अनुपालन करून परीक्षांचे नियोजन करावे.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वर निर्देशित मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

संदर्भ :– परीक्षा–समन्वय/१६६
दिनांक:– १६ जून, २०२१

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ०५ /२०२१**

**विषय : ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२० सत्रातील (नियोजित एप्रिल/मे २०२१) प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुषेशित (Regular/Backlog/Repeaters) परीक्षांचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना.**

कोविड १९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुषेशित विषयांच्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षांचे नियोजन दि. १० एप्रिल २०२१ पासून करण्यात आले आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सुचना खालीलप्रमाणे.

१. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषित व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters Subjects) परीक्षांचे नियोजन ऑनलाईन पध्दतीने दिनांक १० एप्रिल, २०२१ पासुन करण्यात आले आहे. या परीक्षा फक्त ऑनलाईन प्रॉक्टर्ड बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. ऑनलाईन प्रॉक्टर्ड पध्दतीने होणाऱ्या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील.

२. सदर परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषित व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters) ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलद्वारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

४. ऑनलाईन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही जतन (Save) होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा पुन्हा सुरु होईल. तसेच परीक्षेदरम्यान काही अडचणी आल्यास (०२०) ७१५३०२०२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा.

५. ऑनलाईन परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी परीक्षेमधील नमूना प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test) मुख्य परिक्षेपूर्वी दिनांक ५ एप्रिल, २०२१ ते ९ एप्रिल २०२१ सकाळी १० ते दुपारी ३ पर्यंत या कालावधीत करण्यात येईल व तसे सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

६. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

७. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या नियमित, अनुशेषित व रिपीटर (Regular/Backlog/Repeaters) विषयांच्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षा या परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र. ४/२०२१ दि. १६ मार्च, २०२१ रोजी प्रसिध्द केल्याप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमावर होतील. तसेच अभियांत्रिकी २०१५ पॅटर्नच्या प्रथम वर्षाच्या प्रथम सत्रातील अनुशेषित विषयांच्या परिक्षा या १०० टक्के अभ्यासक्रमावर आधारित असतील.

८. गणित व संख्याशास्त्र अभ्यासक्रमातील विषयांच्या परीक्षा ऑनलाईन प्रॉक्टर्ड पध्दतीने, बहुपर्यायी (MCQ) पध्दतीने, ५० गुणांकरिता, ३० प्रश्न प्रत्येकी २ गुणांसाठी या पध्दतीने विचारण्यात येतील. विद्यार्थ्यांनी दिलेली २५ प्रश्नांची अचुक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील.

९. सर्व विद्यार्थ्यांना विषयात मिळालेले गुण (Online Score) हे परीक्षेनंतर ४८ तासात Student Profile System मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील ४८ तासाच्या आत अडचणी व शंका असल्यास तक्रार तेथेच नोंदवावी, Student Profile System मध्ये नोंदवीलेल्या तक्रारीच ग्राहय धरण्यात येतील व त्यानंतर कोणत्याही सबबीवर तक्रार स्वीकारली जाणार नाही.

१०. प्रत्येक विद्यार्थी ऑनलाईन परिक्षा पूर्ण केल्याची पोहोच (Acknowledgement) दिसेल सदर बाबीचा स्क्रीन शॉट/फोटो/प्रिंट विद्यार्थ्यांनी आपल्याकडे जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

११. सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी sppuexam.in या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच परीक्षांबाबत सूचना (Instructions), उपयोगकर्ता पुस्तिका (User Manual) व व्हिडीओ (Videos) याच संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

मा.प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/६९
दिनांक : ०१ एप्रिल, २०२१

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/स्वायत्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. ०४/२०२१

**विषय : ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० (नियोजन एप्रिल/मे, २०२१) परीक्षेच्या आयोजनाबाबत.**
**संदर्भ : कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेले निर्णय.**

कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० या परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने नियोजन करण्यात येत आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० सर्व अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षांचे नियोजन दिनांक १० एप्रिल, २०२१ पासून करण्यात आले आहे. या परीक्षा फक्त Online बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. Online पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा हया ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील.

२. या परीक्षांकरिता बहुतांश अभ्यासक्रमांमधील (Programmes) पाठयक्रम (Syllabus) १०० टक्के पूर्ण झाला असल्याने त्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया १०० टक्के पाठयक्रमांवर होतील. तसेच बी.ए., बी.कॉम.हे वार्षिक अभ्यासक्रम व बहि:स्थ यांच्याही परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमांवर होतील.

३. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे प्रथम सत्र दिनांक ६ फेब्रुवारी, २०२१ पासून सुरु झालेले आहे. जसे की, प्रथम सत्र वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी, विधी, एम.एड, एम.पी.एड, बीएस्सी-बी.एड, बी.ए.-बी.एड या अभ्यासक्रमांच्या परीक्षा संबंधित अभ्यास मंडळांकडून प्राप्त सूचनेनुसार प्रथम घटकापासून (युनिट) सुरु होणा-या ७० टक्के अभ्यासक्रमावर होतील.

४. प्रथम सत्राच्या परीक्षांसाठी फक्त लेखी परीक्षांचे (Theory Papers) गुण विद्यार्थ्यांना Students Profile System मार्फत उपलब्ध करुन दिले जातील. नजिकच्या कालावधीमध्ये संबंधित विद्यार्थ्यांचे टप्प्याटप्प्याने निकाल जाहीर होतील. त्या निकालाच्या अनुषंगाने टप्प्याटप्प्याने मार्च/एप्रिल, २०२१ परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र उपलब्ध करुन दिले जातील. तथापि, ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० व मार्च/एप्रिल, २०२१ या परीक्षांची गुणपत्रके/श्रेयांक पध्दतीने एकत्रितरित्या नंतर वितरीत केली जातील.

५. खाली नमूद केलेल्या प्रथम वर्षाच्या अनुशेषित/नियमित (असल्यास) अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर आयोजित करण्यात याव्यात.

| | |
|---|---|
| कला | B.A.2013 |
| वाणिज्य | B.B.A. (Computer Application) 2016<br>B.B.M. (International Business) 2013<br>B.B.A. (International Business) 2016<br>B.B.A. (Revised 2013)<br>B.Com. 2013 |
| विधी | B.A.LL.B.(Rev.2017)<br>LL.B.(Rev.2017) |

| | |
|---|---|
| विज्ञान | B.Sc.(Biotech) 2013<br>B.Sc. (Animation) 2016<br>B.C.A. (Science) 2016<br>B.Sc. (Computer Science) 2013<br>B.Sc. HS (2017)<br>B.Sc. Regular 2013 |
| अभियांत्रिकी | M.E.(All Elective Subjects) |

उपरोक्त परीक्षांचे आयोजन केंद्र व राज्य शासनाने शासनाने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आरोग्याची संपूर्ण काळजी घेऊन ऑनलाईन/ऑफलाईन (जसे शक्य होईल तसे) पध्दतीने बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या दिनांक १० एप्रिल, २०२१ पासून महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर आवश्यक त्या उपलब्ध सुविधांचा वापर करुन करण्यात यावे. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात यावेत. या परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/परिसंस्था यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व याबाबतचा सविस्तर तपशील परीक्षा-समन्वय कक्षास सादर करण्यात यावा. तसेच यामधील अनुशेषित व नियमित परीक्षार्थीचे पेपर एकाच दिवशी येणार नाहीत याची संपूर्ण काळजी महाविद्यालय/परिसंस्था यांनी घ्यावी.

६. इन-सेमिस्टर, ऑनलाईन, सेशनल परीक्षा (लेखी परीक्षेच्या विषयांसाठी व अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील Fundamentals of Programming Languages या विषयांसाठी) महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर उपलब्ध सुविधांचा वापर करुन घेण्यात याव्यात. याबाबतचे वेळापत्रक महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर निश्चित करुन त्यानुसार विद्यार्थ्यांना अवगत करण्यात यावे. इंटरनल मार्कस्, वेब पोर्टल सुविधा वापरुन विद्यार्थ्यांना या परीक्षांत मिळालेले गुण विद्यापीठाकडे दिनांक १० एप्रिल, २०२१ पर्यंत पाठविण्यात यावेत.

७. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम ते व्दितीय सत्रासाठी एकत्रितरीत्या प्रात्यक्षिक, मौखिक, सेमिनार, मिनी प्रोजेक्टस्, प्रोजेक्ट्स व डेझरटेशन परीक्षांचे आयोजन त्या त्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या दिनांक १० एप्रिल, २०२१ पासून सुरु होणा-या विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० परीक्षांच्या शेवटच्या पेपरनंतर लगेचच ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने करण्यात यावे. त्याकरिता वेगळे परिपत्रक निर्गमित केले जाणार नाही. या प्रात्यक्षिक व इतर उल्लेखित परीक्षांचे गुण त्वरीत इंटरनल मार्कस वेबपोर्टल सुविधा वापरुन भरण्यात यावेत. कुठल्याही प्रात्यक्षिक, मौखिक, सेमिनार, मिनी प्रोजेक्टस्, प्रोजेक्ट्स व डेझरटेशन परीक्षांकरिता परीक्षा विभागाकडून बहि:स्थ परीक्षकांच्या नेमणूका अथवा महाविद्यालयांकरिता वेगळे वेळापत्रक पाठविले जाणार नाही. संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्रांच्या ऑनलाईन परीक्षा पूर्ण झाल्यावर लगेचच मा.प्राचार्य/संचालक यांनी महाविद्यालय स्तरावर परीक्षकांच्या नेमणूका करुन परीक्षांचे आयोजन करावे. या परीक्षांचे गुण इंटरनल मार्कस वेबपोर्टल सुविधा वापरुन भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. फक्त एम.सी.ए.व एम.बी.ए. व तत्सम अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिकांसाठी बहि:स्थ पर्यवेक्षक विद्यापीठाकडून नेमण्यात येतील.

८. ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० च्या परीक्षांचे वेळापत्रक दिनांक २५ मार्च, २०२१ पर्यंत विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केले जाईल. या परीक्षा निर्धारीत वेळेत पूर्ण होणे अनिवार्य असल्यामुळे विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विशेष बाब म्हणून बहुपर्यायी परीक्षांचे आयोजन सर्व रविवारच्या दिवशीही करण्यात आलेले आहे याची कृपया नोंद घ्यावी.

९. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन परीक्षांच्या बाबतीत आवश्यक ती सर्व माहिती विद्यार्थ्यांना एसएमएस व ई-मेलव्दारे अवगत करण्यात येईल. मात्र यासाठी विद्यार्थ्यांचा नोंदणीकृत ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

१०. Online परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही सेव्ह होऊन खंड पडल्यास तेथून परीक्षा पुन्हा सुरु होईल.

११. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी सर्वसाधारण प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन (Mock Test/Practice Test) मुख्य परीक्षेपूर्वी दिनांक ७ एप्रिल, २०२१ पासून करण्यात येईल व तसे सर्व संबंधितांना अवगत करण्यात येईल.

१२. दिव्यांग विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे सोयी व सवलती देय राहतील. तसेच या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी २० मिनिटे अधिकचा वेळ देय राहील.

१३. Online पध्दतीने होणा-या बहुपर्यायी प्रश्न (MCQ)परीक्षांसाठी छायांकित प्रत व पुनर्मूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही.

१४. **ज्या महाविद्यालयांकडून ज्या विद्यार्थ्यांचे इन सेमिस्टर, ऑनलाईन व सेशनल परीक्षांचे अंतर्गत गुण दिनांक १० एप्रिल, २०२१ पर्यंत विद्यापीठास प्राप्त होतील त्याच विद्यार्थ्यांचे निकाल फक्त ऑनलाईन पध्दतीने जाहीर करण्यात येतील व गुणपत्रके मार्च/एप्रिल, २०२१ च्या परीक्षांचे निकालाबरोबरच एकत्रित वितरीत करण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

१५. विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्य केलेल्या परीक्षा आराखडयानुसार विद्यार्थ्यांच्या संबंधित परीक्षेसाठी गुणांचे रुपांतरण केले जाईल. उदा. अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी परीक्षा आराखडयानुसार ७० गुणांची परीक्षा आहे. या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२० ची ऑनलाईन पध्दतीने ५० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांवर आधारीत परीक्षा देतील. या परीक्षेत ५० पैकी विद्यार्थ्यास मिळालेले गुण गणितीय सूत्र वापरुन ७० गुणांपैकी मिळालेल्या गुणांत रुपांतरित केले जातील.

१६. परिपत्रक क्र.१२५ अंतर्गत येणा-या अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे नियोजन महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाच्या परीक्षांच्या नियोजनाच्या धर्तीवर करण्यात यावे. स्वायत्त महाविद्यालय/संस्थांनी सर्व नियमांचे अनुपालन करुन परीक्षा घेण्यात याव्यात.

उपरोक्त परीक्षांचे आयोजन केंद्र व राज्य शासनाने शासनाने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आरोग्याची संपूर्ण काळजी घेऊन ऑनलाईन/ऑफलाईन (जसे शक्य होईल तसे) पध्दतीने बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या दिनांक १० एप्रिल, २०२१ पासून महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर आवश्यक त्या उपलब्ध सुविधांचा वापर करुन करण्यात यावे. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात यावेत. या परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/परिसंस्था यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे व याबाबतचा सविस्तर तपशील परीक्षा-समन्वय कक्षास सादर करण्यात यावा. तसेच यामधील अनुशेषित व नियमित परीक्षार्थीचे पेपर एकाच दिवशी येणार नाहीत याची संपूर्ण काळजी महाविद्यालय/परिसंस्था यांनी घ्यावी.

१७. सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी व परीक्षेदरम्यान येणा-या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी sps.unipune.ac.in मध्ये लॉगीन करुन आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये संपर्क साधावा.

मा.प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करुन याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे व त्यांच्या शंकाचे निरसन करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/५३(अ)
दिनांक : १६ मार्च, २०२१

प्रति,
१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

FOR THE UPLIFTMENT OF THE MASSES
SHRI SHIVAJI MARATHA SOCIETY'S
SAMAJ BHUSHAN BABURAO alias APPASAHEB JEDHE
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
425, SHUKRAWAR PETH, PUNE - 411 002. OFF. : (020) 24477335, FAX : (020) 24450936
Email : jedhe_c@rediffmail.com Visit our website : www.jedhecollege.ac.in
Principal
Dr. SHASHANK K. POLE (M.Com., M.Phil., Ph.D.) ACCREDITED BY NAAC 'B' GRADE
EST : 1984 - AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY - IDNT NO. PU/PN/ACS/063/1984/RECOGNISED BY U.G.C. U/S 2(F) & 12 (B)

Outward No. Date :

सुचना
(परीक्षा विभाग)

<u>प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष वाणिज्य प्रॅक्टीकल परीक्षा मार्च/एप्रिल २०२१</u>

महाविद्यालयातील प्राध्यापकांना कळविण्यात येते कि, वर्षाअखेरीस होणाऱ्या प्रथम / द्वितीय/तृतीय वर्ष वाणिज्य, विज्ञान, विज्ञान संगणक, बीबीए(सीए), एम.कॉम. आणि एम.एस्सी(मायक्रो)या वर्गांना प्रॅक्टीकल शिकविणाऱ्या संबंधित प्राध्यापकांना सुचित करण्यात येते की,विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या मार्च/एप्रिल-२०२१ मध्ये प्रात्यक्षिक परीक्षा सर्व प्रात्यक्षिक विषय शिकविणाया प्राध्यापकांनी आपापल्या सोयीनुसार ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात.सदर परीक्षांचे गुण विद्यापीठात वेळेत सादर होणे अत्यावश्यक आहे,याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

( डॉ.भोसले जी.एस.)
प्रभारी प्राचार्य
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।
श्री शिवाजी मराठा सोसायटीचे
# समाजभूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
४२५, शुक्रवार पेठ, पुणे - ४११ ००२. ऑ. : ०२०-२४४७७३३५, फॅक्स : (०२०) २४४५०९३६
Email : jedhe_c@rediffmail.com Visit our website : www.jedhecollege.ac.in
प्राचार्य
डॉ. शशांक कृ. पोळ (एम.कॉम., एम.फील, पीएच.डी.)
नॅक द्वारा प्रमाणित बी ग्रेड

स्थापना १९८७- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न - आयडेन्टीफिकेशन नं. : पीयु/पी.एन./एससीए./०६३/१९८७ कलम क्र. २(F) व १२ (B) अंतर्गत यु.जी.सी. मान्यता

जा. क्र. दिनांक ०१/०३/२०२१

## महत्वाची सुचना
## (परीक्षा विभाग)

महाविद्यालयातील सर्व तृतीय वर्ष कला, वाणिज्य विज्ञान, विज्ञान संगणक, बीबीए(सीए), एम.कॉम व एम.एस्सी वर्गांना शिकविणाया सर्व संबंधित विषय शिक्षकांना सुचित करण्यात येते की,कोरोना(कोव्हीड-१९) या आप्पत्तीच्या पार्श्वभुमीवर महाविद्यालय पुन्हाः शासनाने बंद केलेले आहेत,त्यामुळे महाविद्यालयातील अंतीम वर्गाच्या अंतर्गत/सत्रांत/मिड सेमिस्टर परीक्षा ऑफलाईन घेणे शक्य नसल्याने व विद्यापीठाने प्रथम सत्रातील परीक्षा दि.१५/०३/२०२१ पासुन घेण्याचे नियोजित केल्याचे असल्याने आपल्याला वरील सर्व वर्गांच्या महाविद्यालयीन परीक्षा दि.१५/०३/२०२१ पुर्वी घेणे गरजेचे आहे.सदर बाबतीतील नियोजनाबाबतची मिटींग बुधवार दि.०३/०३/२०२१ रोजी दु.१२.०५ वा.ऑनलाईन पध्दतीने ऑनलाईन लेक्चर आढावा संदर्भातील मिटींग डॉ.मोजाड ए.यु.यांनी आयोजित केलेली आहे. सदर आढावा मिटींग संपल्यानंतर त्यामध्येच परीक्षा संदर्भातील नियोजन होणार आहे.सदर मिटींग मध्ये संबंधित वर्गातील संबंधित विषयाच्या शिक्षकांनी व परीक्षा विभागातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचायांनी सहभागी होणे अनिवार्य असुन सदर बाबतीत आपली काही मते असतील ती मांडावीत,म्हणजे सदर परीक्षा सुरळीत पार पाडणे शक्य होईल.

(डॉ.डी.एम.चव्हाण)
महाविद्यालय परीक्षा अधिकारी
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११ ००२.

(डॉ.सतिश अ.ओसले)
प्रभारी प्राचार्य
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

Scanned with CamScanner

FOR THE UPLIFTMENT OF THE MASSES
SHRI SHIVAJI MARATHA SOCIETY'S
SAMAJ BHUSHAN BABURAO alias APPASAHEB JEDHE
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
425, SHUKRAWAR PETH, PUNE - 411 002. OFF. : (020) 24477335, FAX : (020) 24450936
Email : jedhe_c@rediffmail.com Visit our website : www.jedhecollege.ac.in
Principal
Dr. SHASHANK K. POLE (M.Com., M.Phil., Ph.D.)
ACCREDITED BY NAAC 'B' GRADE
EST : 1984 - AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY - IDNT NO. PU/PN/ACS/063/1984/RECOGNISED BY U.G.C. U/S 2(F) & 12 (B)

Outward No.

Date : १८/०३/२०२१

## महत्वाची सूचना
## (परीक्षा विभाग)

प्रथम व व्दितीय वर्ष कला २०१९ पॅटर्न चॉईस बेस क्रेडिट सिस्टम च्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, एफ.वाय.बी.ए. सेमिस्टर -१.नियमित व बॅक लॉग आणि एस.वाय.बी.ए. सेमिस्टर -३ च्या नियमित विद्यार्थ्यांची अंतर्गत २० गुणांची परीक्षा बहुपर्यायी प्रश्नाव्दारे( MCQ) पध्दतीने दिनांक ३०/०३/२०२१ पासून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे ऑन लाईन पध्दतीने होणार आहे.सदर परीक्षेस २५ प्रश्न दिले जातील त्यार पैकी २० प्रश्न सोडवावयाचे आहेत.तरी संबंधीत वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांनी खालील सूचनांचे काटेकोर पालन करावे.

१. आपणाला शिकवित असलेल्या सर्व विषय शिक्षकांच्या सूचनेप्रमाणे असायमेंट/ग्रुप डिसक्शन / पीपीटी इ. त्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे त्यांचेकडेच सबमिट कराव्यात.
२. ३० मार्च २०२१ पासून सुरू होणा-या २० गुणांच्या अंतर्गत परीक्षेसाठी सर्वांनी ऑन लाईन परीक्षा देणे अनिवार्य आहे.अन्यथा अंतर्गत परीक्षेचे व असायमेंट/ग्रुप डिसक्शन/पीपीटी इ. चे ३० पैकी असणारे गुण मिळणार नाहीत.याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
३. जे विद्यार्थी अद्यापही आपणास शिकवित असणा-या शिक्षकांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपला जॉईट झालेले नसतील तर त्यांनी संबंधीत विषय शिक्षकांना भेटून त्या त्या विषयाच्या ग्रुपला जॉईट व्हावे.अन्यथा आपणास परीक्षा देता येणार नाही. कारण त्या त्या विषयाच्या ग्रुपवरच त्या त्या विषयाच्या परीक्षेची लिंक येणार आहे.
४. व्दितीय वर्ष कला वर्गातील सर्व नियमित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की. आपण घेतलेला स्पेशल विषय शिकवित असलेल्या विषय शिक्षकांना भेटून त्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपला जॉईट होणे आवश्यकच आहे.

( डॉ.चव्हाण डी.एम.)
महाविद्यालय परीक्षा अधिकारी
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
[illegible] महाविद्यालय

( डॉ.सतिश अ.भोसले)
प्रभारी प्राचार्य
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

FOR THE UPLIFTMENT OF THE MASSES
SHRI SHIVAJI MARATHA SOCIETY'S
SAMAJ BHUSHAN BABURAO alias APPASAHEB JEDHE
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
425, SHUKRAWAR PETH, PUNE - 411 002. OFF. : (020) 24477335, FAX : (020) 24450936
Email : jedhe_c@rediffmail.com Visit our website : www.jedhecollege.ac.in
Principal
Dr. SHASHANK K. POLE (M.Com., M.Phil., Ph.D.) ACCREDITED BY NAAC 'B' GRADE
EST : 1964 - AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY - IDNT NO. PU/PN/ACS/063/1964/RECOGNISED BY U.G.C. U/S 2(F) & 12 (B)

Outward No.

Date : 6/03/2021

महत्वाची सूचना
(परीक्षा विभाग)

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम व व्दितीय वर्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या सर्व वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या विषय शिक्षकांनी दिलेल्या असायमेंट/प्रोजेक्ट/पीपीटी अद्यापही ऑन लाईन/ऑफलाईन सबमिट केलेल्या नाहीत अशा सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी संबंधीत विषय शिक्षकांनी सांगितल्या प्रमाणे आपली असायमेंट /प्रोजेक्ट/ पीपीटी वेळेत ऑन लाईन/ऑफलाईन सबमिट करावेत. जे विद्यार्थी सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना अंतर्गत/मिड सेमिस्टरचे गुण मिळणार नाहीत. तरी सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी संबंधीत वर्गांना शिकविणा-या विषय शिक्षकांना संपर्क करून दिनांक २५/०३/२०२१ रोजी पर्यंत इंटरनल ॲसेसमेंट साठीचे सर्व काम पूर्ण करणे अनिवार्य आहे.

सदर गुण ऑन लाईन पध्दतीने विद्यापीठात सादर करावयाचे असल्याने दिलेल्या वेळेत आपले असायमेंट /प्रोजेक्ट/ पीपीटी सादर करावेत. जे विद्यार्थ्यांचे सादर करणार नाहीत त्यांचे गुण विद्यापीठास पाठविले जाणार नाहीत याची सर्व संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

(डॉ.डी.एम.चव्हाण)
महाविद्यालय परीक्षा अधिकारी
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११ ००२

(डॉ.सतिश अ. [illegible])
प्रभारी प्राचार्य
स. भू. बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

FOR THE UPLIFTMENT OF THE MASSES
SHRI SHIVAJI MARATHA SOCIETY'S
**SAMAJ BHUSHAN BABURAO alias APPASAHEB JEDHE**
**ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE**
425, SHUKRAWAR PETH, PUNE - 411 002. OFF. : (020) 24477335, FAX : (020) 24450936
Email : jedhe_c@rediffmail.com Visit our website : www.jedhecollege.ac.in
Principal
Dr. SHASHANK K. POLE (M.Com., M.Phil., Ph.D.) ACCREDITED BY NAAC 'B' GRADE
ST : 1984 - AFFILIATED TO SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY - IDNT NO. PU/PN/ACS/063/1984/RECOGNISED BY U.G.C. U/S 2(F) & 12 (B)

Outward No. Date : 6/2/2?

## परीक्षा संबंधीत सूचना

महाविद्यालयातील ऑनलाईन परीक्षा घेणेकामी फक्त मार्गदर्शन करणेसाठी खालील समिती स्थापन केली आहे. ही समिती फक्त परीक्षेसंबंधीतच महाविद्यालयातील शिक्षकांना मार्गदर्शन करतील. परीक्षेचे पेपर काढणे, विद्यार्थ्यांना लिंकद्धारे टाकणे तसेच त्याची तपासणी करून मार्क भरणेची संपूर्ण जबाबदारी संबंधीत विषय शिक्षकांची असणार आहे.

तरी महाविद्यालयातील प्राध्यापकांना ऑनलाईन परीक्षेसंबंधीत काही अडचण येत असेल तर खालील समितीतील प्राध्यापकांचे आपण मार्गदर्शन घेऊ शकता.

१. प्रा.डॉ. दिपक सुरवसे
२. प्रा.डॉ.फर्नांडिस टि.डी.
३. डॉ.सोमनाथ गुणवरे
४. डॉ. मंगेश जाधव

डॉ. सतिश अ.भोसले
प्रभारी प्राचार्य
स.भू.बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

बहुजन हिताय बहुजन सुखाय

**श्री शिवाजी मराठा सोसायटीचे,**

**समाजभूषण बाबुराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**

४२५, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

महाविद्यालय विकास समिती

सभा क्रं. १/२०१९-२०

सभा दिनांक- २५/ १ /२०२०

जा.क्रं.१२ ७२/२०१९-२०२०

स.भू.बा. उर्फ अप्पासाहेब जेधे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

४२५, शुक्रवार पेठ, पुणे २

दिनांक :११/०२/२०२०

सभेचा वृत्तांत

स.भू.बा.उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २ च्या महाविद्यालय विकास समितीची पहिली सभा बुधवार दिनांक २४/०७/२०१९ व २०/०८/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या कार्यालयात बोलविण्यात आलेली होती सदर तहकूब झालेली सभा शनिवार दिनांक २५/०१/२०२० रोजी दुपारी १.१५ वाजता महाविद्यालयाच्या कार्यालयात खालील विषयांचा विचार विनिमय करण्याकरीता भरली होती. सदर सभेस खालील सभासद हजर होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री. सुरेश विश्वनाथ खैरे | अध्यक्ष |
| २. | मा.श्री.शशिकांत शं.सुतार. | ऑनररी सेक्रेटरी , माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य, |
| ३. | मा.श्री. प्रमोद रामचंद्र झोंड | सदस्य |
| ४. | मा.श्री.अनिल बाळासाहेब पायगुडे | सदस्य |
| ५. | मा.डॉ. आशालता विठ्ठलराव कोलते | सदस्य |
| ६. | प्रा.मेजर शत्रुघ्न दत्तात्रय क्षीरसागर | प्रभारी प्राचार्य |
| ७. | प्रा.डॉ.संजय पंढरीनाथ गायकवाड | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८. | प्रा.वैशाली बबन देठे | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ९ | श्री. मुरलीधर के.सातव (रजिस्ट्रार) | प्राध्यापकेत्तर प्रतिनिधी |
| १०. | प्रा.श्री.अशोक उत्तम मोजाड | गुणवत्ता हमी समिती प्रतिनिधी |

दूरध्वनी क्रमांक:
०२०–२५६०१२०६
फॅक्स: ०२०–२५६०१२०६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा समन्वय विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website: www.unipune.ac.in
e-mail: coe@unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा–समन्वय/ 321

दिनांक: १० डिसेंबर, २०२१

प्रति,

मा. अध्यक्ष,
प्राश्निक मंडळ
ऑनलाईन परीक्षा मार्च /एप्रिल, २०२० (आयोजन ऑक्टोबर,२०२०)

विषय : विद्यापीठ परीक्षा मार्च /एप्रिल, २०२० (आयोजन ऑक्टोबर,२०२०) मधील ऑनलाईन परीक्षेचे प्रश्नसंच जमा करणा–या परंतू ऑनलाईन पध्दतीने मानधन भरता न येवू शकणा–या पेपर चेअरमनची मानधन देयके ऑफलाईन पध्दतीने करणेबाबत.

महोदय/महोदया,

मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ ऑनलाईन परीक्षा मार्च /एप्रिल, २०२० (आयोजन ऑक्टोबर,२०२०) परीक्षांचे ई–मेलद्वारे प्रश्नसंच जमा करणा–या परंतू ऑनलाईन पध्दतीने मानधनाची देयके भरता न येवू शकणा–या पेपर चेअरमनच्या मानधनाची देयके ऑफलाईन पध्दतीने भरुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर देयके खालील पध्दतीने स्विकारण्यात येतील.

१. पेपर चेअरमनने ऑफलाईन पध्दतीने देयके भरण्यासाठी दिनांक १५ जानेवारी,२०२२ च्या आत गोपनीय कक्ष, परीक्षा विभाग येथे प्रत्यक्ष येऊन आवश्यक फॉर्म भरुन देण्यात यावेत.

२. ऑफलाईन पध्दतीने देयके भरण्याची व्यवस्था ऑनलाईन परीक्षा मार्च /एप्रिल, २०२० (आयोजन ऑक्टोबर,२०२०) या परीक्षांचे ई–मेलद्वारे प्रश्नसंच जमा करणा–या परंतू ऑनलाईन पध्दतीने मानधनाची देयके भरता येवू न शकणा–या पेपर चेअरमनसाठीच उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

३. ऑफलाईन पध्दतीने देयके भरण्यासाठी आपल्या बरोबर प्रश्नसंच तयार करण्यासाठी विद्यापीठाने काढलेला आदेश तसेच आपल्या बरोबर संबंधित प्रश्नसंच तयार करण्यासाठी असलेल्या इतर प्राश्निक सदस्यांची नावे घेऊन यावीत. आपण

सादर केलेल्या माहितीची पडताळणी गोपनीय कक्षाद्वारे केल्यानंतर आपणास ऑफलाईन पध्दतीनी देयके भरता येतील.

४. उपरोक्त बाबींबाबत आपणास शंका/प्रश्न असल्यास (०२०)२५६२१४५३ या फोन वर गोपनीय कक्षाशी संपर्क साधावा.

५. ऑफलाईन पध्दतीने वरीलप्रमाणे देयके भरण्याची शेवटची तारीख दिनांक १५ जानेवारी,२०२२ आहे. त्यानंतर ही व्यवस्था उपलब्ध असणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६. ज्या पेपर चेअरमननी ऑनलाईन देयके भरलेली आहेत त्यांनी पुन्हा देयके भरण्यासाठी येवू नयेत, त्यांची सदर देयके पूर्णपणे तपासून परीक्षा समन्वय कक्षाने संबंधित कार्यवाही केलेली आहे.

संचालक

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६२१४४०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
Website :www.unipune.ac.in
e-mail :coe@unipune.ac.in
sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/ १८८ दिनांक : १३/०६/२०२२

तातडीचे व महत्वाचे

प्रति,
१. मा.पोलीस आयुक्त,
पुणे शहर / नाशिक शहर
२. मा.पोलीस अधीक्षक,
पुणे शहर / अहमदनगर जिल्हा व नाशिक जिल्हा

विषय :- विद्यापीठ परीक्षा मार्च / एप्रिल २०२२ (आयोजन जून / जुलै २०२२)

महोदय / महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध परीक्षा पुणे शहर, पुणे जिल्हा, नाशिक शहर, नाशिक जिल्हा, अहमदनगर शहर व अहमदनगर जिल्यातील अनेक परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

सन २०२२ च्या प्रथमार्धात होणाऱ्या विद्यापीठाच्या लेखी परीक्षा दिनांक २०/०६/२०२२ पासून सुरू होत आहेत. या परिक्षा विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थामधून जवळपास ९०० परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येत आहेत.

विद्यापीठामार्फत जून / जुलै - २०२२ या कलावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या परिक्षांचा कार्यक्रम टप्या टप्याने जाहीर करण्यात येत आहे.

विद्यापीठाच्या परिक्षा अत्यंत शिस्तबध्द व निकोप वतावरणात पार पाडण्यासाठी संबंधित परीक्षा केंद्रप्रमुख, प्राचार्य / वारिष्ठ पर्यवेक्षक यांना तसेच विद्यापीठाला पोलीस विभागाची यापूर्वी आवश्यकतेनुसार सहकार्य मिळालेले आहे. तसेच सहकार्य सन २०२२ च्या प्रथमार्धात होणाऱ्या विद्यापीठाच्या निरनिराळ्या परिक्षांच्या दरम्यान आपले सहकार्य कृपया मिळावे.

तरी कृपया विद्यापीठाच्या उपरोक्त परीक्षा चालू असेपर्यंतच्या कालावधीत शहरांच्या व जिल्हयातील संबंधित परीक्षा केंद्राच्या ठिकाणी तसेच परिक्षा केंद्रांचे केंद्रप्रमुख, प्राचार्य व वरिष्ठ पर्यवेक्षक यांना गरजेनुसार पोलीस सहकार्य कृपया उपलब्ध करुन द्यावे व तशा सूचना आपल्या विभागातील सर्व संबंधितांना द्याव्यात अशी विनंती आहे.

विद्यापीठाच्या निरनिराळ्या परीक्षा सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी आपण विद्यापीठास वेळोवेळी सहकार्य केलेले आहेच, ते यापुढेही मिळत राहील असा मला विश्वास आहे.

कळावे,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत - वरीलप्रमाणे
प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :-
१. मा.प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था

विद्यापीठ परीक्षांचे आयोजन व्यवस्थित व निकोप वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची / संस्थेची आहे. याकरिता आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त नजिकच्या पोलीस चौकीकडून उपलब्ध करुन घेण्यात यावा. महाविद्यालयामध्ये / संस्थेमध्ये पोलीस बंदोबस्ताची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाची राहील.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक ९३/२०२०

**विषय :— कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मे—जून, २०२० सत्र पध्दती अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या नियोजनातील विशेष तरतूदीबाबत...**

**संदर्भ :— १) युजीसी गाईडलाईन्स पत्र क्र.डी.डी.नं, एफ—१/२०२०(सचिव),दि.२९/०४/२०२०.**

**२) युएनआय/२०२०/बैठक/विशि—१/४१३१/ए, दिनांक ८ मे, २०२०.**

कोव्हीड—१९ च्या प्रादुर्भावामुळे व त्यानुसार झालेल्या टाळेबंदीमूळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकांचे नियोजन करण्याकरीता राज्य शासनाने समिती गठित केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्विकृत केल्याचे व त्या शिफारशींच्या अनुषंगाने विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करुन अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्याचे संदर्भीय पत्राद्वारे सूचित केलेले आहे.

सदर शिफारशींमध्ये नमूद केलेल्या तरतूदी तसेच मार्गदर्शक तत्वे स्विकारुन त्याअनुषंगाने कार्यवाहीची प्रक्रिया विद्यापीठाने सुरु केलेली आहे. दरम्यान यासंदर्भात विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने उपरोक्त अहवालात नमूद केलेल्या बाबींचे सहजसुलभ आकलन होण्यासाठी सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. यासंबंधी काही अडचणी असल्यास महाविद्यालयातील कर्मचारी विद्यापीठ परीक्षा विभागात संपर्क साधु शकतील. यासंबंधीची अंतिम तपशिलवार कार्यपध्दती संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यतेने जाहीर करण्यात येईल.

## अ) परीक्षा आवेदनपत्र (Examination Forms)

१) मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता विविध अभ्यासक्रमाच्या विविध सत्रातील सर्व पात्र व इच्छूक विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्राची (Examination Forms) प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे.

२) ज्या विद्यार्थ्यांनी मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता निर्धारीत वेळेत यापूर्वीच परीक्षा आवेदनपत्राची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे, त्यांना पुन्हा आवेदनपत्र भरण्यांची आवश्यकता नाही.

३) मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता विविध अभ्यासक्रमातील, विविध सत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे अद्याप सादर केलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता लिंक दिनांक १९/०५/२०२० ते २८/०५/२०२० या कालावधीत उपलब्ध राहील.

४) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरुन विहीत आवेदनशुल्क विद्यापीठाकडे ऑनलाईन गेटवे मार्फत भरावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेले आवेदनपत्र महाविद्यालयाकडून इनवर्ड झाल्यानंतर आवेदन पत्राची प्रक्रिया पूर्ण होईल. यासंदर्भात रेड झोन मधील महाविद्यालयांची काही विशेष अडचण असल्यास त्यांनी विद्यापीठास संपर्क करावा.

५) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या आवेदनपत्रांचा गोषवारा स्वरुपातील तपशिल महाविद्यालयांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्यात येईल, जेणेकरुन इनवर्ड करण्याची प्रक्रिया सुलभरित्या पूर्ण करता येईल. महाविद्यालय स्तरावर ही आवेदनपत्रे दिनांक ३०/०५/२०२० पर्यंत इनवर्ड करणे अनिवार्य राहील.

६) या संपूर्ण प्रक्रियेत कुठल्याही प्रकारचे विलंब अथवा अंतिविलंब शुल्क सद्यपरिस्थितीत विशेष बाब म्हणून मे–जून, २०२० सत्रापुरते आकारले जाणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना आवेदनपत्रात यापूर्वी असे विलंब शुल्क लागू झाले आहे, तसेच त्यांनी ते महाविद्यालयामध्ये भरले आहे अशा शुल्काचा परतावा करण्यासंबंधी विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे योग्य वेळी परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

**ब) अंतिम सत्राचे विद्यार्थी वगळता सत्र पध्दतीमधील इतर विद्यार्थ्यांच्या परीक्षा :**

१) अंतिम सत्र वगळता इतर विद्यार्थ्यांच्या लेखी अथवा प्रात्याक्षिक अशा कुठल्याही परीक्षा केंद्रावर पारंपारिक पध्दतीने हजर राहून प्रत्यक्ष परीक्षा घेतल्या जाणार नाहीत. याबाबत त्यांच्या परीक्षेसंबंधी शासन निर्देशामध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रक्रिया पुर्ण करून त्याचे निकाल जाहीर केले जातील.

२) उपरोक्त विद्यार्थ्यांच्या विविध विषयांच्या परीक्षांचे निकाल शासन निर्देशामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित विषयातील ग्रेड ही ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारीत (उपलब्ध असल्यास) व ५० टक्के मागील लगतच्या सत्रातील परीक्षेचे गुण (उपलब्ध असल्यास) यावर आधारीत राहील. अपवादात्मक/अनियमित प्रकरणांबाबत करावयाची कार्यवाही स्वतंत्रपणे सुनिश्चित करण्यात येईल.

३) उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांच्या नियमित प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा होणार नाहीत. या परीक्षांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर या सत्रात पूर्वीच केलेले अंतर्गत मूल्यमापन, जर्नलस, टर्मवर्क, मौखिक परीक्षा अथवा अभ्यासक्रमात नमूद तत्सम तरतूदी यांच्या आधारावर केले जाईल.

४) उपरोक्त विद्यार्थ्यांच्या कोणत्याही बॅकलॉग विषयांची परीक्षा जुलै, २०२० मध्ये होणार नाही. अशा विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयांची परीक्षा पुढे नविन सत्र सुरु झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल. जर अशा विद्यार्थ्यांना जुलै, २०२० परीक्षेच्या निकालानंतर परफॉर्मन्स इम्प्रुव्हूमेंट हवी असल्यास त्याकरीता पुढील सत्रामध्ये संधी देण्यात येईल.

**क) अंतिम सत्रातील नियमित, पुन:परीक्षार्थी व अनुशेषीत विद्यार्थी (रेग्युलर, रिपीटर आणि बॅकलॉग) :**

१) अंतिम सत्रात असलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्रातील विषयांची तसेच सर्व सत्रातील बॅकलॉग विषयांची लेखी परीक्षा पारंपारिक पध्दतीने घेण्यात येईल. विशेष बाब म्हणून सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल ५० टक्के अंतर्गत गुण/इनसेमीस्टर/सेशनल इ. व ५० टक्के शेवटच्या सत्रात घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षांच्या एकत्रित मूल्यमापनावर आधारीत असतील. सदर तरतूद केवळ विद्यमान शैक्षणिक सत्रापुरती असेल.

२) सदर विद्यार्थ्यांच्या नियमित व बॅकलॉग प्रात्याक्षिक/मौखिक परीक्षा/प्रोजेक्ट परीक्षा इत्यादीची व्यवहार्यता तपासून अंतर्गत मुल्यांकनाद्वारे अथवा व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे घेण्यात येतील.

३) विद्यार्थ्यांना ज्या विषयांची परीक्षा द्यावयाची आहे त्याची तपशिलवर माहिती खालीलप्रमाणे:

- दोन वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये चौथ्या सत्राचे विद्यार्थी व चौथ्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र १, २ वं ३ मधील बॅकलॉगचे विषय असतील, अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
- तीन वर्षीय अभ्यासक्रमामध्ये सहाव्या सत्राचे विद्यार्थी व सहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ३, ४ व ५ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
- चार वर्षीय अभ्यासक्रमामध्ये आठव्या सत्राचे विद्यार्थी व आठव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ५, ६ व ७ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
- पाच वर्षीय अभ्यासक्रमामध्ये दहाव्या सत्राचे विद्यार्थी व दहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ७, ८ व ९ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.

**ड) पुढील शैक्षणिक वर्षात आश्वासित प्रवेश (Carry Forward)**

१) अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता इतर सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात/सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जाईल. सदर तरतूद केवळ विद्यमान शैक्षणिक वर्षापुरती असेल.

२) मागील शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या (Year Down) विद्यार्थ्यांना उपरोक्त तरतूदीनुसार पुढील शैक्षणिक वर्षात/सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जाईल.

३) उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांनी ते गैरहजर असणा—या किंवा अनुत्तीर्ण झालेल्या विषयांच्या परीक्षा जेव्हा त्या परीक्षांचे आयोजन होईल तेव्हा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**इ) इतर तरतूदी**

१) विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी सर्वअधिनस्त महाविद्यालये व परीसंस्था हे परीक्षा केंद्र म्हणून राहतील.

२)	ज्या विद्यार्थ्यांनी क्लास इम्प्रुव्हमेंटसाठी अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची परीक्षा पुढे नविन सत्र सुरु झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल. त्यासाठी पुन्हा परीक्षा आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता असणार नाही.

३)	उपरोक्त नमूद सर्व प्रकारची कार्यवाही करताना कोव्हिड १९ प्रादुर्भाव प्रतिबंधक उपाययोजना तसेच यासंदर्भात शासनाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घेणे अनिवार्य आहे.

उपरोक्त सर्व नमूद बाबी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी आहेत. या सर्व बाबीं सक्षम प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी ठेवून, प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच उपरोक्त बाबींमध्ये झालेले बदल आपणांस सूचित करण्यात येतील.

16/5/2020

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

संदर्भ: परीक्षा समन्वय/३०९
दिनांक: १६ मे, २०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:—**

सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, विद्यापीठ परिसर, प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय व संस्था—यांना विनंती की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या निर्देशनास आणून देण्यात यावे.

| अ.नं. | मा.सभासदाचे नाव | हुद्दा | मोबाईल नंबर | सही |
| --- | --- | --- | --- | --- |
| २० | श्री.सुभाष नामदेव चव्हाण<br>स.नं.६ हिस्सा नं.७/१ बी, करोना,<br>सी-२,फ्लॅट नं.६०३,कात्रज कोंढवा रोड<br>रोड,कोढवा बुा, खडी मशिन पोलीस<br>चौकीच्या मागे, पुणे ४११ ०४८ | सभासद | ९४२२६९१६७७ | |
| २१ | श्री.गजानन संभाजीराव जेधे<br>७२, गुरुवार पेठ, जेधे निवास बिल्डिंग<br>फ्लॅट नं.२, पुणे-४११००२ | सभासद | ९८५०६४७९८० | |
| २२ | अॅड.नथूराम धोंडिबा पाटील<br>डी-१,अनंतनगर सोसायटी,<br>कलानगर,सातारा रोड, धनकवडी,<br>पुणे-४११०४३ | सभासद | ९४२२००२०००<br>९०११३३१०००<br>०२०-२४३७१०१० | |
| २३ | डॉ.सुनिल भिकाजीराव जगताप<br>साई-स्नेह हॉस्पिटल,पी.एम.टी.बस डेपोसमोर<br>कात्रज, पुणे -४११०४६ | सभासद | ९८२२०३६७३६ | |
| २४ | श्री.अमर राजाराम शिंदे<br>कृपासिंधू, प्लॉट नं.४०, संत एकनाथनगर<br>भाग २, पूनम पार्कजवळ,बिबवेवाडी<br>पुणे -४११०३७ | सभासद | ९८५०२७१९८१ | |
| २५ | श्री.प्रदिप किसनराव उरसळ<br>पितृछाया बंगला,३२२/४ फुले कॉलनी<br>म.फुले पेठ,शंकरशेठ रोड, मीरा सोसायटी<br>पुणे -४११०४२ | सभासद | ९४२२००४८९३ | |
| २६ | श्री.महादेव शिवराम पवार<br>सर्व्हे नं.२३/४/२, बालाजीनगर<br>धनकवडी, पुणे -४११०४३<br>जयभवानी माता मंदिराजवळ,गॅरेजसमोर | सभासद | ९८९०६७११७७ | |
| २७ | श्री.नंदकिशोर तुकाराम बगाडे<br>मु.पो.उरुळी कांचन,<br>ता.हवेली, जिल्हा पुणे-४१२ २०२ | सभासद | ९७६४९९५५६६ | |
| २८ | श्री.सचिन वसंतराव शिंदे<br>१३९३,शुक्रवार पेठ,आलिशान फर्निचर<br>बाजीराव रोड, पुणे -४११००२ | सभासद | ९८२२०३७१३८ | |

# Bharat Sanchar Nigam Ltd

BSNL

Account No: 1024811418
Invoice Date: 03/07/2020
Invoice No: WDCMH1913755060
Billing Period
01/06/2020 to 30/06/2020

Tariff Plan: Fibro 2500GB/Month CS66

B-8
23

Bill Mail Service    Tax Invoice

SSMS S B B ALIAS
APPASAHEB JEDHE ACS
COLLEGE
425
SHUKRAWARPETH-
SHUKRAWARPETH PUNE IN
PUNE-PUNE
411002
India

| TELEPHONE NO | AMOUNT PAYABLE | DUE DATE |
|---|---|---|
| 020-29804662 | ₹ 18496.00 | 25-07-2020 |
| Internet | PAY NOW | |

## ACCOUNT SUMMARY

Deposit Amount: 5999.00
Customer GSTIN:

| PREVIOUS BALANCE पिछली राशि | | PAYMENT RECEIVED पूर्व भुगतान | | ADJUSTMENTS समायोजन | | CURRENT CHARGES वर्तमान शुल्क | | TOTAL DUE कुल बकाया | | AMOUNT PAYABLE देय राशि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ₹ 19375.06 | (-) | ₹ 7005.00 | (+) | ₹ 101.78 | (+) | ₹ 6023.34 | (=) | ₹ 18495.18 | (=) | ₹ 18496.00 |

Amount in words: Eighteen Thousand Four Hundred Ninety Six Rupees and Zero Paisa Only

## SUMMARY CHARGES

| Current Charges | वर्तमान शुल्क विवरण | Amount ₹ |
|---|---|---|
| Recurring Charges | पुनरावर्ती शुल्क | 5089.00 |
| One Time Charges | एक बार शुल्क | 0.00 |
| Usage Charges | उपयोग प्रभार | 0.00 |
| Miscellaneous Charges | विविध प्रभार | 0.00 |
| Discount | छूट | 0.00 |
| Tax | कर | 934.34 |
| Total Current Charges | वर्तमान शुल्क | 6023.34 |

18,496
729
19,225

**Tax Details**

| Tax Type | Percentage | Amount | Taxable Value |
|---|---|---|---|
| CGST | 9.00% | 467.17 | 5190.78 |
| SGST/UTGST | 9.00% | 467.17 | 5190.78 |
| 6 Paisa Cash Back Offer Amount | | | 0.00 |

USAGE HISTORY (6 MONTHS)




श्री शिवाजी मराठा सोसायटी पुणेचे
समाजभूषण बाबुराव उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पुणे-२.
आवक क्र. 908/2020-21
तारीख 06/08/2020
फाईल क्र.

**Dear Customer, in view of COVID-19 pandemic, be safe & avoid venturing out. We recommend you to pay the bill online using https://portal.bsnl.in/ Or use My Bsnl app on your mobile to avail our services 24*7. My Bsnl app is available on the Google play**

Dear Customer,

Please subscribe to BSNL Annual/Biannual/Triennial Plans (Advance Rental Plans) for Landline/Broadband/ Bharat Fibre and enjoy extended service offers like 13 / 27 / 40 Months service by paying only for 12 / 24 / 36 Months Rental respectively.

To avail this offer, please call us on our Toll free number 18003451500 OR visit our nearest Customer Care Center OR Click below link to upgrade to annual plan.

http://bsnl.co.in/NewAnnualPlans

प्रभारी प्राचार्य
स.भू.बा. उर्फ आप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
पुणे-४११००२.

लेखा अधिकारी
Accounts Officer (TR)
Scan QR Code for making Bill Payment through Internet




- PAYMENT SLIP -

BHARAT SANCHAR NIGAM LTD

Mode of payment

☐ Cash ☐ Cheque/DD ☐ Credit/Debit Card

Cheque/DD No 211911 Dated 05-08-2020 Bank ________ Branch ________

Please Charge Rs. ________ Signature ________ Drop box.

| Invoice No | WDCMH1913755060 |
|---|---|
| Invoice Date | 03/07/2020 |
| Account No | 1024811418 |
| Phone No | 020-29804662 |
| Due Date | 25-07-2020 |
| Amount Payable | ₹ 18496.00 |

For Bank use only

Cheque/DD/Pay order for Amount Payable (Rounded Up) in favour of AO (Cash), BSNL, PUNE

Treasurer
Shri Shivaji Maratha Society, Pune

ऑनररी सेक्रेटरी
श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे-२.